


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com




वर्ष २ रे | अंक : ६७७. वा | बुधवार | दि. ०७ फेब्रुवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# महसूल विभागासोबतच जिल्हा रुग्णालयातील कारवाईही शून्य...

# बुलढाण्यात ठायी-ठायी मिळतेय भ्रष्टाचाराला खतपाणी...

**पोस्टमार्टम ६३**

**जनसंचलन/ बुलढाणा**

लोकसभेची निवडणूक काही महिन्यांवर आलेली असताना बुलढाण्यात फक्त चर्चा आहे ती विविध ठिकाणी बोकाळलेल्या भ्रष्टाचाराची. महसूल विभाग असो की, जिल्हा सामान्य रुग्णालय. सगळ्या ठिकाणी भ्रष्टाचाराने थैमान घातले आहे. भ्रष्टाचाराचा हा आक्राळविक्राळ राक्षस आपले हात-पाय फैलावत असताना त्याविरोधात कारवाई मात्र कोणीही करताना दिसून येत नाही. सगळीकडे हेच चित्र असताना दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज मात्र या भ्रष्टाचाराविरोधात एकाकी लढा देत आहे. येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात गेल्या अनेक वर्षांपासून भ्रष्टाचाराने प्रचंड थैमान घातलेले आहे. भ्रष्टाचार जिल्हा रुग्णालयाच्या नसनसात भिनल्यासारखा दिसून येतो आहे. विशेष म्हणजे या ठिकाणी होणारा भ्रष्टाचार हा काही एक-दोन अधिकारी अपवादात्मक परिस्थितीत करीत नाहीत. या ठिकाणी होणारा भ्रष्टाचार हा पूर्णपणे संघटितरित्या होतो आहे. खालपासून वर पर्यंत हा भ्रष्टाचार बोकाळेला असल्याने या भ्रष्टाचाराच्या शृंखलेत गुरफटलेल्या एकाही अधिकाऱ्यावर कोणतीही कारवाई होत नाही. कोरोना महामारीच्या आधीपासून भ्रष्टाचार आणि प्रचंड अनागोंदी कारभारामुळे जिल्हा रुग्णालय चर्चेचा विषय बनले आहे. कोरोना महामारीच्या काळात तर या ठिकाणी भ्रष्टाचाराने अक्षरशः उत्तुंग शिखर गाठले होते. या ठिकाणी काम करणारे अनेक अधिकारी भ्रष्टाचारात सामिल आहेत. त्यापैकी अधिकाऱ्यांचे एक त्रिकुट तर फारच सक्रिय होते. या अधिकाऱ्यांवर भ्रष्टाचार प्रकरणी कारवाई होण्याऐवजी नंतर त्यांच्या बदल्या आणि बढत्या झाल्या आहेत. त्यापैकीच एक महाठग अधिकारी सचिन वासेकर हा काही दिवसांपूर्वी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकला आणि त्याने स्वतःची वाट लावून घेतली. बाकीचे अधिकारीही मोकाट आहेत.सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन ने काही महिन्यांपूर्वी जिल्हा रुग्णालयाच्या कॅशबुकात खाडाखोड करून कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा सर्वप्रथम भंडाफोड केला होता. त्या प्रकरणात मुख्यतः सहभागी असलेले पी. के.माळी हे या भ्रष्टाचाराचे शिरोमणी आहेत. त्यांनी आपल्या भ्रष्टाचारात अनेक अधिकाऱ्यांना सामिल करून घेतले. त्यात जिल्हा रुग्णालयात गेल्या काही वर्षांमध्ये आलेले जिल्हा शल्यचिकित्सक व प्रभारी जिल्हा शल्यचिकित्सक देखील सामिल आहेत. म्हणूनच पी. के. माळी यांच्यावर कोणतीही कारवाई आजवर झाली नाही. माळी यांची नंतर बदली झाली व नंतर ते सेवानिवृत्त देखील झाले. पि.के. माळी यांनी आर.एस.लाकडे यांच्याकडे रोखपालपदाचा पदभार देताना अनेक कागदपत्रे आधीच गहाळ केली. लाकडे यांनीही मुर्खपणाने अर्धवट कारभार स्वीकार करून घेतला. जेंव्हा यासंदर्भात सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनने विचारणा केली, त्या वेळी लाकडे हे स्वतःला अत्यंत साळसूद व निष्पाप दाखवण्याचा प्रयत्न करू लागले. परंतु लाकडे हे देखील तसे शातीरच. कारण आपल्या पूर्वसूरींनी भ्रष्टाचाराचा मलिदा खाल्ला तर आपणही खावा, असा त्यांचा विचार असू शकतो. त्यामुळे त्यांनीही शातीरपणे ही खेळी खेळलेली असण्याची शक्यता आहे. रोखपालपदाचा संपूर्ण पदभार देणे व गहाळ केलेली कागदपत्रे देण्यासाठी अनेकदा जिल्हा शल्यचिकित्सकांनी माळी यांच्याशी पत्रव्यवहार केला, परंतु माळी सातत्याने ठेंगा दाखवत राहिले. त्यामुळे जिल्हा शल्यचिकित्सकांनी यात पोलिसांना ओढण्याचा प्रयत्न केला. जिल्हा शल्यचिकित्सकांनाही आमचे सांगणे आहे की, या भ्रष्टयाचाऱ्याना प्रशासन होणे फार गरजेचे आहे. जर खरंच तुम्हाला पी.के.माळी यांच्याकडून हिशेब घ्यायचा असेल, तर त्यांची पेंशन तात्काळ बंद करा. व त्याला चौकशी समोर जाऊद्या व त्याच्या कार्यकाळातील गहाळ झालेल्या किंवा केलेल्या अति महत्वाचे कागदपत्रांची माहिती चौकशी अधिकाऱ्याना देऊ द्या व नंतरच त्याची पेन्शन सुरू करा परंतु असे होण्याचे चित्र जिल्हा सामान्य रुग्णालयात दिसून येत नाहीत. कारण जिल्हा रुग्णालयात मतू मारल्यासारखं कर मी रडल्यासारखं करतोफ्क्षसा प्रकार सुरू आहे. या प्रकारातून भ्रष्टाचाराला कधीही आळा बसणार नाही, उलटपक्षी भ्रष्टाचाराचाला चालनाच मिळेल. ती आजही मिळते आहे. एव्हढे सगळे होऊन ही जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचार राजरोसपणे सुरू आहे. काही अधिकारी अत्यंत निर्लज्ज आणि गेंड्याच्या कातडीचे झाले आहेत. कुणाचे खेटर कुणाच्या पायात नसल्याचे चित्र आहे. तसेच महसूल विभागात ज्याप्रमाणे भ्रष्टाचाराला शिष्टाचाराचे स्वरूप प्राप्त झाले आहे आणि भ्रष्टाचाऱ्यांना अभय दिल्या जात आहे, तोच प्रकार जिल्हा रुग्णालयात देखील होताना दिसून येत आहे. जिल्हा रुग्णालयात असलेला गलथान कारभार आणि भ्रष्टाचार असला, तरी सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन मात्र या भ्रष्टाचाराविरोधात कणखरपणे भूमिका घेत राहणार. भ्रष्टाचाऱ्यांची जागा तुरुंगात आरक्षित केल्याशिवाय दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज कधीही ही मोहीम थांबवणार नाही. त्यासाठी कितीही महिने हा लढा लढावा लागला, तरी आमची तयारी आहे.

**अजून बरेच काही पुढील भागात...**

> आमचा हा लढा दोषींवर जो पर्यंत कारवाई व भ्रष्टाचारातून कमावलेली करोडो रुपयांची संपत्ती / अपसंपदा शासन तिजोरीत जमा होत नाही हा लढा अजूनही खोलात जाऊन असाच सुरू राहणार




> **या सर्व भ्रष्टाचार प्रकरणात कोणत्याही राजकीय नेत्यांनी पुढाकार घेऊन संबंधित अधिकाऱ्याकडून माहिती घेऊन दोषींवर कडक कारवाई व्हावी असे बुलडाणा जिल्हातील सत्तेतील व विरोधात असलेल्या राजकीय मान्यवर नेत्यांनी आम्ही शासनाकडे सर्व पुरावे देऊनही वेळोवेळी बातमीपत्रातून प्रकाशित करून प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न करून सुद्धा या करोडो रुपयांच्या भ्रष्टाचार गंभीर प्रकरणात अद्याप पर्यंत का लक्ष देत नाही.याची जिल्हाभर चर्चा सुरू आहे.**

---

# दे. राजात गुटख्यासह २ लाख १४ हजारांचा मुद्देमाल जप्त दे. राजा पोलिस व एलसीबीची कारवाई

**जनसंचलन/ देऊळगाव राजा**

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकासह देऊळगाव राजा पोलिसांनी केलेल्या संयुक्त कारवाईमध्ये जालना रोडवरील दोन गुटखा विक्री करणाऱ्या आरोपींकडून अवैध गुटख्यासह इतर मुद्देमाल असा दोन लाख १४ हजार ४४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. दोन्ही आरोपींविरोधात देऊळगाव राजा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील तसेच ग्रामीण भागातील किराणा दुकान तसेच पान टपरीवर शासनाने प्रतिबंधित केलेल्या या गुटख्याची तथा तंबाखूजन्य पदार्थांची विक्री होत आहे. त्यानुषंगाने गोपनीय माहितीच्या आधारावर पोलिसांनी चिखली-जालना मार्गावर सिनगाव फाट्याजवळ दोन दत्वाक्लीनरून होत असलेली गरख्यात्ती अवैध वाहतूक थांबवली. दोन्ही आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्याकडून गुटख्याचा मुद्देमाल तसेच दुचाकी असा २ लाख ४४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस कर्मचारी सुधाकर काळे यांच्या तक्रारीवरून महम्मद इकबाल महम्मद शफी (३९, रा. कबाडपुरा), शेख अफसर शेख सबदर (३८, रा. हकीमपुरा) यांच्या विरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक भारत




चिरडे करीत आहेत. दरम्यान देऊळगाव राजा तालुक्यातील ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणात प्रतिबंधीत गुटख्याची विक्री होत आहे.

# सुंदरकांड प्रवक्ता प.पू. सुश्री अलकाश्रीजीं यांची सद्भावना सेवा समितीने काढली भव्य शोभायात्रा...






**जनसंचलन/बुलढाणा**

सुंदरकांड प्रवक्ता प.पू.सुश्री अलकाश्रीजीं यांचे चंपालाल शर्मा यांच्या घरी आगमन होताच आतिषबाजी करण्यात आली, महिलांनी ओवाळले. पेठेतील राममंदिर मध्ये अलकाश्रीचे आगमन झाल्यावर पूजा दर्शन झाले. अलकाश्रीजीं यांनी सुंदरकांड ग्रंथ भाईजींना दिला. तद्वतच भाईजींनी मुख्य यजमान श्रीमती सरलादेवी अग्रवाल, पंकज अग्रवाल, शेवाळे मामा यांना दिला. अश्वधारी बग्गी मध्ये देवींजी शोभून दिसत होत्या. रामभरोसे भजन मंडळ अकोटचे ढोलपथक दिलीप भाऊ नेमाडे यांच्या मार्गदर्शनात, नित्यानंद सेवा प्रकल्प हिवरा आश्रम चे लेझीम पथक अनंत शेळके यांच्या नेतृत्वात, बोराखेडी शेगांव येथील भजनी मंडळ, गजानन महाराज मानकर यांच्या मार्गदर्शनाखाली पावली खेळत होते. राम दरबारची झांकी मध्ये राधाकृष्ण गोपींची रासलीला शोभायात्रेचे मुख्य आकर्षण होते. कु दिशा, कु गीता, कु स्वरा, चि. स्वराज राम लक्ष्मण सीता हनुमान च्या वेषात तर, जयस्वाल परिवारातील मुलींनी रासलीला ची झांकी केली होती.शोभायात्रा यशस्वी करण्यासाठी चंपालाल शर्मा, भाईजी, डॉ सुकेश झंवर, राजेश देशलहरा, सुरेश गट्टाणी, लाला माधवाणी, सुभाष दर्डा, नितीन जयस्वाल, अनंताभाऊ देशपांडे, मधुकर गायके, ॲड. जितेंद्र कोठारी, उमेश मुंदडा, आदींनी परिश्रम घेतले.यावेळी श्रीराम मारोती मंदिर चे पदाधिकारी पाचशेच्या वर कलशधारी महिला यांचे बुलडाणा अर्बन मुख्यालय, ओम आनंद ज्वेलर्स तर्फे शरबत व जलपान व्यवस्था करण्यात आली.दिपक वर्मा, दिपा वर्मा,किरण वर्मा, आनंद वर्मा यांनी देवीजींचे पूजन व माल्यार्पण केले.

## निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बदल्यांचे वार...

### आरडीसींची सुत्रे घेणार निर्भय जैन : सिंदखेडच्या एसडीओंसह सहा तहसीलदारांच्या बदल्या

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

लवकरच लोकसभा निवडणुकीचा फिवर चढणार असून, प्रशासकीय स्तरावर महसूलमधील अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे वारे वाहू लागले आहे. गेल्या कित्येक महिन्यांपासून रिक्त असलेल्या निवासी उपजिल्हाधिकारीपदाची सुत्रे निर्भय जैन घेणार आहेत. तसेच सिंदखेड राजाचे उपविभागीय अधिकारी संजय डव्हळे यांच्यासह जिल्ह्यातील सहा तहसीलदारांच्या बदल्या झाल्या आहेत. निवासी उपजिल्हाधिकारी दिनेश गीते यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतल्यापासून आरडीसींचे पद रिक्त आहे. आता ही जागा निर्भय जैन यांच्या रुपाने भरली जात आहे. लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम केव्हाही जाहीर होऊ शकतो, यासाठी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे सत्र सुरू झाले आहे. सध्या यवतमाळ येथे उपजिल्हाधिकारी (महसूल) म्हणून नेमणूक झालेले मात्र रुजू न झालेल्या निर्भय जैन यांची बुलढाणा येथील निवासी उपजिल्हाधिकारीपदी बदली झाली आहे. सिंदखेड राजाचे उपविभागीय अधिकारी संजय डव्हळे यांची धाराशिव येथे योगेश खरमाटे यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या एसडीओपदी बदली झाली आहे. बुलढाण्याचे तहसीलदार रुपेश खंडारे यांची यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा येथे बदली झाली आहे. त्यांच्या जागी व्ही. एस. कुमरे रुजू होणार आहे. देऊळगाव राजाचे तहसीलदार श्याम धनमने यांची अकोला येथील जिल्हाधिकारी कार्यालयात अधीक्षकपदी बदली झाली आहे. या ठिकाणी छत्रपती संभाजीनगर येथून वैशाली डोंगरजाळ रुजू होतील. त्याचप्रमाणे चिखलीचे तहसीलदार सुरेश कव्हळे यांची अकोल्यात बदली झाली आहे. चिखलीला अमरावती येथील संतोष काकडे तहसीलदार म्हणून येतील. शेगावचे तहसीलदार समाधान सोनावणे यांच्या जागी बार्शी टाकळीचे दीपक बाजड रुजू होतील. संग्रामपूर येथील तहसीलदार योगेश्वर टोंपे यांच्या जागी आर्णी येथील तहसीलदार पी.झेड. भोसले येणार आहेत. मलकापूरचे तहसीलदार राजेंद्र सुरडकर यांची उमरखेड येथे बदली झाली आहे. याठिकाणी बाळापूरचे तहसीलदार आर.एम. तायडे येतील.

## प्री मॅट्रीक शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याचे आवाहन...

**जनसंचलन/बुलडाणा**

समाजकल्याण विभागातर्फे जिल्ह्यातील शासनमान्य शाळामधील पहिली ते दहावीमध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. सदर शिष्यवृत्ती सन २०२३-२४ पासून महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येणार आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. पाचवी ते सातवी, आठवी ते दहावीमध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती, पाचवी ते दहावीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती, नववी व दहावीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थी, विद्यार्थिनींना भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती, दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा फी, शिक्षण फी, तसेच अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांचे पहिली ते दहावीमध्ये शिकणाऱ्या पाल्यांना शिष्यवृत्ती, या सर्व शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी शाळांच्या मुख्याध्यापकांनी शिष्यवृत्तीसाठी सन २०२३-२४ चे सर्व पात्र विद्यार्थ्यांची महाडीबीटी प्रणाली वेबलिंक .. या पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी मनोज मेरत यांनी केले आहे

बुलडाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरुण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
◆ कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
◆ अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
◆ लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
◆ संधीवातावर उपचार
◆ गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
◆ फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
◆ मणक्यातील आजारावर उपचार
◆ दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
◆ कंबरेचे व मानेचे दुखणे
◆ पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार
डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

## बांधकाम कामगारांनी खोट्या अमिषाला बळी पडू नये- कामगार विभागाचे आवाहन

**जनसंचलन/बुलडाणा**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या असंघटीत कामगारांची नोंदणी, नूतनीकरण व विविध योजना लाभ वाटपाचे काम सरकारी कामगार अधिकारी, बुलडाणा कार्यालयामार्फत ऑनलाइन पद्धतीने केले जाते. त्यामुळे बांधकाम कामगारांनी खोट्या आमिषाला बळी पडू नये, असे आवाहन कामगार विभागाने केले आहे. कार्यालयातील कामकाजासाठी कोणत्याही खासगी प्रतिनिधी, अथवा एजंट, दलाल यांची नेमणूक करण्यात आली नाही. त्यामुळे संबंधित कामगारांना अर्ज नोंदणीसाठी वार्षिक केवळ एक रुपया शुल्क आकारण्यात येत असून, त्यांची रीतसर पावती देण्यात येते. या व्यतिरिक्त या कार्यालयाकडून कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले जात नाही. बांधकाम कामगारांनी इतर कोणत्याही खोट्या अमिषाला बळी पडू नये. नियमानुसार नोंदणी व नूतनीकरण



करून घ्यावी. याबाबतीत फसवणूक झाल्यास सदर कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच अतिरिक्त रक्कम मागणी करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध नजिकच्या पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवावी, असे आवाहन सरकारी कामगार अधिकारी आ. शि. राठोड यांनी केले आहे.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# तू माझ्यासोबत का बोलत नाही? मला का भेटत नाही;म्हणून चाळीस वर्षीय उमेश बराटे चा खामगावात कारनामा!

**जनसंचलन/ खामगाव**



चाळीस वर्षीय उमेश बराटे याने रस्त्याने घरी जाणाऱ्या महिलेचा एकटी पाहून विनयभंग केल्याची घटना खामगाव शहरात उघडकीस आली आहे. झाले असे की, खामगावच्या डीपी रोडवरून ३० वर्षीय महिला ४ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ७.३० वाजताच्या दरम्यान एकटी घरी जात होती. यावेळी उमेश डिगांबर बराटे (४० ) रा. शिवजीफैल खामगाव याने तिला पाठलाग केला. रस्त्यात अडविले तू माझ्यासोबत का बोलत नाही? मला का भेटत नाही? असे म्हणून वाईट उद्देशाने तिचा हात पकडला. महिलेने माझा हात सोड मला तुझ्या सोबत बोलायचं नाही. असे म्हटले तर बराटे याने महिलेच्या गालावर चापट मारून तिला शिवीगाळ केली. अशी तक्रार खामगाव शहर पोलीस स्टेशनला दाखल झाली आहे. पुढील तपास पोहेकॉ गजानन पाटील करीत आहेत.

# सी.आर.पी.फ जवान विनायक काळणे यांचा सेवानिवृत्त निमित्ताने टेंभुर्णा गावात गावकऱ्यांच्या वतीने सत्कार!

**जनसंचलन/ खामगाव**



खामगाव तालुक्यातील टेंभुर्णा येथील सीआरपीएफ जवान विनायक नारायण काळणे हे ३१ जानेवारी रोजी सेंट्रल रिझर्व्ह पोलीस फोर्स मध्ये १५ वर्ष सेवा देवून सेवानिवृत्त झाले आहेत. टेंभुर्णा गावकऱ्यांच्या वतीने १ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी काळणे यांचा सत्कार करण्यात आला. विनायक काळणे यांचे मोठे भाऊ ही बीएसफ () मध्ये कार्यरत होते, काही वर्षा आधी तेही मध्ये यशस्वी सेवा बजावून सेवानिवृत्त झाले आहेत. विनायक काळणे हे जेव्हा सेवानिवृत्ती होवून त्याच्या मूळ गावी टेंभुर्णा येथे पोहचले यावेळी गावकऱ्यांनी आपापल्या दारी रांगोळी काढून, फटाक्यांची आतिषबाजी करून विनायक काळणे यांचा सत्कार केला.

# दलितांवरील अत्याचार विरोधात मेहेकर येथे काढला मोर्चा....



**जनसंचलन/ मेहेकर**

जिल्ह्यातिल् देऊळगाव कोळ येथे प्रजासत्ताक दिनी सोन्याने भरली ओटी या गाण्यावर नृत्य सादर करण्याचा विरोध करणाऱ्या सरपंच व शाळा समिती अध्यक्षानी विरोध करीत दलित बांधवासोबत वाद घातला.. याची तक्रार मेहेकर पोलिसात देण्यात आली आहे .. या घडलेल्या प्रकाराच्या निषेधार्थ मेहेकर येथे प्रा. संजय वानखेडे यांच्या नेतृत्वात् मेहेकर येथे मोर्चा काढण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाटिकेपासून काढण्यात आलेला निषेध मोर्चा तहसील कार्यालयावर धडकला. यावेळी तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. देऊळगाव कोळ येथील संबंधित आरोपींना तत्काळ अटक करावी, सरपंचाला पदावरून तत्काळ बडतर्फ करावे व शाळा व्यवस्थापन समिती तत्काळ बरखास्त करावी, अशा मागण्या या निवेदनाद्वारे करण्यात आल्या.

# ऑनलाईन फसवणुक प्रकरणी दोन आरोपी गजाआड...

## बुलढाणा सायबर पोलीसांची इंदौर,भोपाळ येथे धडक कारवाई

**जनसंचलन/बुलडाणा**

अलीकडे सुशिक्षितांची ऑनलाईन फसवणूक होत असल्याची प्रकरणे वाढत आहे. अशाच ऑनलाईन फसवणुक प्रकरणी बुलढाणा सायबर पोलिसांनी इंदोर आणि भोपाळ येथून दोन आरोपी गजाआड केले आहे. हकीकत अशी की, दिनांक ८ नोव्हेंबर २०२३ रोजी फिर्यादि जय रविंद्र किलोलिया रा. दालफैल खामगाव यांनी पोलीस स्टेशन सायबर बुलढाणा येथे तक्रार दिली की, दिनांक १२ ऑक्टोंबर २०२३ रोजी अज्ञात आरोपीने त्यांचे मोबाईलवर कॉल करुन मै ॲक्सीस बँकसे बात कर रहा हू आपका जीमेल आयडी अपडेट करना मै आपको व्हॉटसॲप पर एक लिंक भेजता हे असे म्हणून लिंक पाठविली. फिर्यादीने लिंकवर क्लीक केले असता अज्ञात आरोपीतांनी तक्रारदार यांच्या मोबाईलचा एक्सेस प्राप्त करून घेवून त्यांचे ॲक्सीस बँकेच्या खात्यामधुन वेगवेगळ्या ट्रांझेक्शनव्दारे फिर्यादीचे एकुण २ लाख ४ हजार रुपयांची ऑनलाईन फसवणुक केली आहे. अश्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सायबर बुलढाणा येथे अपराध क्रमांक ४८/२०२३ कलम ४१९,४२० भादवी सह कलम ६६क, ६६ड आयटी ॲक्ट प्रमाणे दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयांचे तपासामध्ये पोलीस अधिक्षक सुनिल कडासने , अप्पर पोलीस अधिक्षक बी. बी महामुनी यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रल्हाद काटकर यांनी तपासाची चक्रे फिरवून प्राप्त तांत्रिक माहितीच्या आधारे पोलीस स्टेशन सायबरचे पोहेकॉ शकील खान, पोहेकॉ कुणाल चव्हाण, नापोका राजदिप वानखडे, नापोका विक्की खरात, पोकॉ संदिप राऊत तसेच म. सफो सायरा शाह यांचे तपास पथक नेमण सदर तपास पथक इंदौर, भोपाळ (मध्यप्रदेश) येथे रवाना केले. सदर तपासपथकाने तांत्रिक



माहितीच्या आधारे आरोपीतांचा शोध घेवून आरोपी चंदा मनोज सोलंकी वय ४२ वर्ष रा. इंदौर व आरोपी तरुण पंकज खरे वय २२ वर्ष रा जवाहर चौक भोपाळ यांना सापळा रचुन गुन्हयांचे तपासकामी ताब्यात घेतले. आरोपीच्या ताब्यातुन गुन्हयांत वापरलेले ०२ मोबाईल जप्त करण्यात आले आहेत. सदर प्रकरणी आरोपीतांना न्यायालयाने ८ फेब्रुवारी पर्यंत पिसीआर दिला आहे. सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे. नागरीकांनी सायबर गुन्हयांसंबधी तक्रार असल्यास पोलीस स्टेशन सायबर बुलढाणा येथे अथवा सायबर हेल्पलाईन क्रमांक १९३० वर संपर्क करावा असे आवाहन पोलीस निरीक्षक प्रल्हाद काटकर यांनी केले आहे.

# सिंदखेड राजा येथे राष्ट्रमाता जिजाऊ शासकीय महिला कृषी महाविद्यालय मंजूर करा कृषिमंत्री धनंजय मुंडे यांना महेश डोंगरे पाटील यांचे निवेदन



**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

शहरामध्ये राष्ट्रमाता जिजाऊ शासकीय महिला कृषी महाविद्यालय मंजूर करा अशी मागणी राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांना मराठा क्रांती मोर्चा नेते महेश डोंगरे पाटील यांनी निवेदन देऊन केली आहे. सदर निवेदनात म्हटले आहे की,मातृतीर्थ सिंदखेड राजा शहराचा स्वतंत्र परिचय देण्याची गरज नाही, परंतु ज्या शहराने स्वराज्याची प्रेरणा दिली तेथील विकासाचा अनुशेष कायमच वाढत चालला आहे. शहरातील विकासाचे अनेक प्रश्न मार्गी लागावे यासाठी आम्ही सरकार दरबारी प्रामाणिक प्रयत्न करीत आहोत. शहर विकासाच्या दृष्टीकोनातून सिंदखेड राजा शहरामध्ये कृषी विभागाची जवळपास १०० एकर जमीन आहे. या शासकीय जमिनीवर विशेष बाब म्हणून राष्ट्रमाता जिजाऊ शासकीय महिला कृषी महाविद्यालय ५०० मुलींची क्षमता असलेले मंजूर करावे, अशी मागणी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या कडे मराठा क्रांती मोर्चा नेते महेश डोंगरे पाटील यांनी केली आहे. सदर बाबतीत कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यासोबत महेश भैया डोंगरे पाटील यांनी सकारात्मक चर्चा करून. सदर विषय तात्काळ मार्गी लागेल असा. विश्वास धनंजय मुंडे यांनी दिला. महाराष्ट्र मध्ये एकमेव कृषी महाविद्यालय होण्याकरिता खासबाब म्हणून लवकरच निर्मिती करिता असा शब्द कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी दिला महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे आदेशावरून कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी या संदर्भातल्या आदेश व सूचना संबंधित विभागाला तात्काळ त्यांनी दिल्या.

# शरद पवारांना दणका, अजित पवारांना पक्ष आणि चिन्ह, फडणवीस आणि बावनकुळेंची बोलकी प्रतिक्रिया

**वृत्तसंस्था/ पुणे**

निवडणूक आयोगाने अजित पवार गट हाच खरा राष्ट्रवादी पक्ष असल्याचे निर्णय दिल्यानंतर भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांचे अभिनंदन केले. अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला पुढे घेऊन जातील, असा विश्वास व्यक्त केला. ते म्हणाले, मी अजित दादा पवारांचं अभिनंदन करतो की त्यांना निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणून घड्याळ हे चिन्ह दिले आहे. निवडणूक आयोगाने अत्यंत महत्त्वपूर्ण हा निर्णय दिला. बावनकुळे पुढे म्हणाले की, जेव्हा निवडणूक आयोगाचा निकाल येतो तेव्हा तो नियमाप्रमाणे व संविधानाप्रमाणे ज्यांच्याकडे जास्त लोकप्रतिनिधी आणि मतदारांचा कौल आहे. त्यांच्याकडे तो निकाल साधारणतः दिसतो. अजितदादा नक्कीच राष्ट्रवादीचे नेते म्हणून राष्ट्रवादी पक्ष म्हणून पुढे घेऊन जातील. विरोधकांचे काम विरोधात बोललेच आहे म्हणून त्यांचे नावच विरोधक आहे. विरोधक आमच्या बाजूने कसे बोलतील, असा टोला लगावत निवडणूक आयोगावर टीका टिप्पणी करणे योग्य नाही, असे सांगितले. निवडणूक आयोग कधीच बायस निर्णय देत नाही. कुणाच्याही बाजूने निर्णय देताना निवडणूक आयोग खूप दाखले देतो. त्यामुळे आयोगाच्या निकालाला सर्वांनी स्वीकारले पाहिजे असेही ते म्हणाले.यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आमच्या महायुतीतील घटक पक्ष असलेल्या उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तसेच घड्याळ चिन्ह म्हणून निवडणूक आयोगाकडून मान्यता मिळाली, मी त्यांचे, सर्व सहकारी तसेच कार्यकर्त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. दरम्यान




निवडणूक आयोगाने शरद पवार यांना नवीन राजकीय पक्षासाठी तीन नावे देण्याचा पर्याय देण्यास सांगितले आहे. त्यासाठी शरदला ७ फेब्रुवारीला दुपारी ३ वाजताची वेळ देण्यात आली आहे.

## लोकसभा साठी माध्यम प्रमाणीकरण समिती गठीत; पत्रकार संजय जाधव, लक्ष्मीकांत बगाडे यांचा समावेश

**जनसंचलन/बुलढाणा**

लोकसभा व विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समिती गठीत करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉक्टर किरण पाटील यांनी ही समिती गठीत केली आहे. या समितीचे कार्यक्षेत्र बुलढाणा जिल्ह्यातील बुलढाणा, मेहकर, चिखली, खामगाव, जळगाव, सिंदखेड राजा, मलकापूर विधानसभा समितीचे कार्यक्षेत्र आहे जिल्हाधिकारी डॉ पाटील हे समितीचे अध्यक्ष आहेत. समितीत अपर पोलीस अधीक्षक बाबासाहेब महामुनी, साम टीव्ही चे जिल्हा प्रतिनिधी संजय जाधव, दिव्य मराठी चे जिल्हा प्रतिनिधी लक्ष्मीकांत बगाडे, जिल्हा माहिती अधिकारी गजानन कोटूरवार यांचा समावेश आहे.





## सीसीआयतर्फे कापूस खरेदीस सुरवात

**जनसंचलन/बुलडाणा**

भारतीय कापूस महामंडळातर्फे जिल्ह्यातील पाच केंद्रावर कापूस खरेदीस सुरवात करण्यात आली आहे. कापूस पणन महासंघाच्या खामगाव विभागातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या सोयीसाठी चिखली, खामगाव, खामगाव-बी, मलकापूर, नांदुरा, देऊळगाव राजा या ५ कापूस खरेदी केंद्रावर भारतीय कापूस महामंडळामार्फत एफएक्यू प्रतिच्या कापसाची किमान हमी दराने कापूस खरेदी सुरु झाली आहे. तसेच सीसीआयमार्फत जिल्ह्यात जळगाव जामोद आणि शेगाव या २ केंद्रांवर किमान हमी दराने कापूस खरेदी केंद्र उघडण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी आपला कापूस आवश्यक त्या कागदपत्रांसह सीसीआयच्या नजिकच्या केंद्रांवर विक्री करावा, असे आवाहन खामगाव येथील विभागीय व्यवस्थापक यांनी केले आहे.

## रविकांत तुपकर हाजीर हो...तुपकरांच्या जामीन रद्द करण्याच्या अर्जावर आज सुनावणी....

### तुपकरांना आंदोलनाच्या गुन्ह्यात मिळालेला जामीन रद्द करण्यासाठी पोलिसांची न्यायालयात धाव...

**जनसंचलन/बुलढाणा**

शेतकरी नेते रविकांत तुपकर यांना आंदोलनातील गुन्ह्यात मिळालेला जामीन रद्द करण्यासाठी पोलिसांनी न्यायालयात अर्ज केला असून याप्रकरणी आज ता.७ फेब्रु. रोजी सुनावणी होणार आहे. आजच्या न्यायालयात होणाऱ्या सुनावणी कडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. दरम्यान माझ्यावर एकही चुकीचा गुन्हा दाखल नाही, सर्व गुन्हे शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढतांना आंदोलनातील आहे. मी शेतकरी-कष्टकऱ्यांच्या आग्रहास्तव लोकसभा निवडणुक लढविण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील काही सत्ताधारी नेत्यांच्या इशाऱ्यावर मला तुरुंगात टाकण्याचा घाट घातला जात आहे. मला एक काय.. दहा वर्षे तुरुंगात टाका पण शेतकऱ्यांसाठी लढतच राहणार, अशी प्रतिक्रिया रविकांत तुपकरांनी दिली आहे. शेतकऱ्यांसाठी आक्रमकपणे रस्त्यावर येऊन लढणारा नेता अशी रविकांत तुपकर यांची ओळख असली तरी बुलढाणा शहर पोलिसांनी मात्र रविकांत तुपकरांना सराईत गुन्हेगार ठरवलं आहे. तुपकर यांच्या गुन्हेगारी प्रवृत्तीमुळे जिल्ह्यामध्ये वारंवार कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो त्यामुळे त्यांची मागील गुन्ह्यातील जमानत रद्द करून त्यांची तुरुंगात रवानगी करावी,



अशी मागणी बुलढाणा शहर पोलीसांनी अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायाधीश यांच्या न्यायालयाकडे एका अर्जाद्वारे केली आहे. तुपकर यांना सराईत आणि गंभीर गुन्हेगार संबोधुन त्यांचा जामीन रद्द करण्यासाठी बुलढाणा शहर पोलिसांनी केलेली मागणी आश्चर्यकारक आणि तेवढीच धक्कादायक आहे.

## गटई कामगारांनी स्टॉलसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलडाणा**

जिल्ह्यातील अनुसूचित जातीच्या गटई कामगारांनी पत्र्याचे स्टॉल मिळण्यासाठी सन २०२३-२४ या वर्षाकरीता अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पात्र लाभार्थ्यांना दि. ९ फेब्रुवारी २०२४ पर्यंत अर्ज सादर करता येणार आहे. अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्जावर पासपोर्ट फोटो चिकटविलेला व परिपूर्ण अर्ज सादर करावा, अर्जदार हा राज्यातील रहिवासी आणि अनुसुचित जातीचा असावा, अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ग्रामीण भागासाठी ४० हजार रूपये आणि शहरी भागासाठी ५० हजार रूपयांपेक्षा अधिक नसावे. यासाठी तहसिलदाराने दिलेला उत्पनाचा दाखला आवश्यक आहे. तसेच अर्जदाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे. अर्जदाराची स्टॉल मागणीची जागा ग्रामपंचायत, नगरपालिका, छावनी बोर्ड किंवा महानगरपालिकेनी त्याला भाडे, करारनामा, खरेदी अगर मोफत, परंतू अधिकृतरित्या ताब्यात दिलेली असावी किंवा ती त्याच्या स्व:मालकीची असावी. यासाठी वरीलपैकी एक प्रकारचे कागदपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अर्जदाराचा स्वत:चा प्राधिकृत अधिकाऱ्याने दिलेला जातीचा दाखला जोडणे आवश्यक आहे. शाळा सोडल्याचा दाखला, रेशन कार्डची प्रत, आधार कार्डची प्रत, रहिवाशी दाखला आदी स्वसाक्षांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. सदर व्यवसाय योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या गरजू अर्जदारांनी विहित नमुन्यातील अर्ज विनामुल्य प्राप्त करुन घ्यावा. त्यासह आवश्यक कागदपत्रे, अर्जासोबत जोडून सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चिखली रोड, बुलडाणा येथे सादर करावेत. अर्जदारास अर्जातील त्रृटी पुर्ततेबाबत कळविल्या जाणार नसल्याने अर्जदारांनी आवश्यक त्या कागपत्रासह परिपूर्ण अर्ज सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त डॉ. अनिता राठोड यांनी केले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958